## सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## मानधन तत्वावर भरती

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेकडे तात्पुरत्या सहा महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर पाणीपुरवठा मजुर करार पध्दतीने नियुक्ती करणेकरिता सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका क्षेत्रातील कायम रहिवासी असलेल्या इच्छुक उमेदवाराकडुन, दिनांक१३/१२/२०१९ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा मजुर | पदसंख्या - ४० दरमहा परिश्रमीक मोबदला रू. ५,०००/- |
| | शैक्षणिक पात्रता | पात्रता / अर्हता<br>अ. इयत्ता ७ वी उत्तीर्ण.<br>ब. मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक.<br>क. सर्वसाधारण उमेदवारांकरिता वय मर्यादा ३८ पर्यंत.<br>ड. ओबीसी / एसी / एसटी. उमेदवारांकरिता वय मर्यादा ४३ पर्यंत. |

**उमेदवारांना सर्वसाधारण सुचना व अटी -**

१. उमेदवाराने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज शैक्षणिक अर्हता अनुभव, आधार कार्ड, ओळखपत्र, जन्म तारखेचा दाखला, जातीचा दाखला इत्यादी कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचे नांवे फक्त मुख्य बारनिशी येथे सादर करणेचा आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. महापालिका क्षेत्रात रहिवासी नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करुन नयेत.

३. प्राप्त अर्जाची छाननी अंती मुलाखतीची तारीख पात्र उमेदवारांना कळविणेत येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा सध्याचा राहणेचा पत्ता व मोबाईल नंबर , ईमेल आयडी न चुकता नमुद करावा.तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन जे उमेदवार पात्र होतील अशा उमेदवारांची यादी दिनांक१८/१२/२०१९ रोजी महानगरपालिका मुख्यालय सांगली येथील नोटीस बोर्डावर व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर ( WWW.smkc.gov.in )प्रसिध्द करणेत येईल.

४. मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक२३/ १२ /२०१९ रोजी RCH विभाग आपटा पोलिस चौकी, समोर पाण्याच्या टाकीखाली सकाळी १० ते सायं ६ या वेळेत घेणेत येईल. सदर मानधन तत्वावरील नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असुन या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापनेवरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशिर दाद मागता येणार नाही..

५. निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विहित नमुन्यात रुपये.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

६. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या,पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ.बदल वा प्रक्रीया रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त यांच्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

(नितीन कापडणीस)
आयुक्त
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.

क्र.मनपा /आस्थावि / ०१/६३१/२०१९-२०
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका
दिनांक५ /१२ /२०१९

pendrive/jaayeraat